| MHKO160004162014 | नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०१४ मधील<br>निशानी क्र. ४९ वरील आदेश |
|---|---|

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये, तसेच आदेश १ नियम १० प्रमाणे वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूध्द वाटपासाठी दाखल केला असून सदर दाव्याची चौकशी सुरू आहे. वादी यांनी दावा अर्जी कलम १ मध्ये अर्जात नमूदप्रमाणे जमीनींचा समावेश करण्यात यावा व वादपत्रामध्ये दुरूस्ती करावी अशी विनंती केली आहे. वादी यांनी दावा अर्जी कलम ५ नंतर ५अ म्हणून अर्जात नमूदप्रमाणे मजकुर नमूद करण्यात यावा व वादपत्रामध्ये दुरूस्ती करावी अशी विनंती केली आहे. वादी यांनी दाव्याचे टायटलमध्ये दा.रू.२४०/- ऐवजी ४००/- व ज्युरिडिक्शन रूपये १२००/- ऐवजी २०००/- अशी दुरूस्ती करावी अशी विनंती केली आहे. तसेच वादींनी प्रतिवादी क्र. ७ ते १५ म्हणून सदर दाव्याचे कामी पक्षकार करण्यात यावे व अर्जात नमूदप्रमाणे दुरूस्ती करण्यात यावी अशी विनंती केली आहे. वादी यांनी दावा अर्जी कलम ९ मध्ये ९अअ म्हणून अर्जात नमूदप्रमाणे मजकुर नमूद करण्यात यावा व वादपत्रामध्ये दुरूस्ती करावी अशी विनंती केली आहे. वादींनी कथन केले की सदरची दुरूस्ती ही फॉरमल स्वरूपाची असून ही दुरूस्ती ही प्रतिवादी क्र १, ५, ६ यांचे कैफियतीमधील कथनावरून करणे आवश्यक आहे. वादींचे कथनानुसार प्रतिवादींनी कैफियतीमध्ये काउंटर क्लेम दाखल करणे आवश्यक होते. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतू, सदरचा अर्ज नामंजूर केलेस वादींचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादींनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी नं ७,८,१२,१३,१४ यानी सदरकामी नि.५६ वर त्यांचे म्हणणे दिलेले असून त्यांचे म्हणणेनुसार वादी यांचा सदरचा अर्ज साफ खोटा, लबाडीचा व रचनात्मक स्वरूपाचा आहे. त्यांचे कथनानुसार वादींचे सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपामध्ये दिल होणार आहे. दावा मिळकव्यतिरिक्त मिळकती या वि.प. यांनी फार पूर्वी खरेदी केल्या असून त्याबाबत वादी व प्रतिवादी यांची कोणतीही तक्रार नाही. सबब, प्रतिवादी यांनी खरेदी केलेल्या मिळकती या दावेमध्ये समाविष्ट करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. वादींची दुरूस्ती ही फॉर्मल स्वरूपाची नाही व त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरूपामध्ये बदल होत आहे व दाव्यामध्ये विविधता निर्माण होणार आहे. त्यामुळे सदर प्रतिवादींनी वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. मी वादीं, प्रतिवादी क्र. ७,८,१२,१३,१४ यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला,

अभिलेखावरील कागदपत्रे, वार्दी आणि प्रतिवादीं यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूध्द वाटपाबाबत दाखल केला आहे. वादीं यांचे कथनानुसार त्यांनी सदरचा अर्ज दावा अर्जी कलम १ मध्ये अर्जात नमूदप्रमाणे जमीनींचा समावेश करण्यात, वादी यांनी दावा अर्जी कलम ५ नंतर ५अ म्हणून अर्जात नमूदप्रमाणे मजकुर नमूद करण्यात यावा, दावा अर्जी कलम ९ मध्ये ९अअ म्हणून अर्जात नमूदप्रमाणे मजकुर नमूद करण्यात यावा, तसेच दाव्याचे टायटलमध्ये दा.रू.२४०/- ऐवजी ४००/- व ज्युरिडिक्शन रूपये १२००/- ऐवजी २०००/- अशी दुरूस्ती होणेबाबत विनंती केली आहे. वादी यांनी व वादपत्रामध्ये दुरूस्ती करावी अशी विनंती केली आहे. वादींनी कथन केले की सदरची दुरूस्ती ही फॉरमल स्वरूपाची असून ही दुरूस्ती ही प्रतिवादी क्र १, ५, ६ यांचे कैफियतीमधील कथनावरून करणे आवश्यक आहे. याउलट, प्रतिवादी नं ७,८,१२,१३,१४ यांचे म्हणणेनुसार वादी यांचा सदरचा अर्ज साफ खोटा, लबाडीचा व रचनात्मक स्वरूपाचा आहे, वादींचे सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपामध्ये दिल होणार आहे, दावा मिळकव्यतिरिक्त मिळकती या वि.प. यांनी फार पूर्वी खरेदी केल्या असून त्याबाबत वादी व प्रतिवादी यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे प्रतिवादी यांनी खरेदी केलेल्या मिळकती या दावेमध्ये समाविष्ट करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींनी वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. वादीं व प्रतिवादीं यांचे परस्परविरोधी कथनानुसार त्यांचे कथनांबाबत पुराव्याअंती निश्चित सांगता येणार आहे. तथापि, वादी यांची दुरूस्ती ही दोन्ही पक्षकारांमध्ये असणारे सर्व वादमुद्दे निकाली करण्यासाठी आवश्यक आहे. वादीं यांचे सदरचे दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपावर कोणताही परिणाम होणार नाही. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद व गुंतागुंत टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

०१ अर्ज नि.४९ मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी प्रतिवादीं यांना रक्कम रू.३००/- द्यावे या अटीवर वादी यांना वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.05.06 11:08:11 +0530

दिनांक- ०२/०५/२०२३

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी